मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) ''यावरून एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांनी नमून सार्वजनिक सत्यास साष्टांग प्रणिपात करावा अथवा सार्वजनिक सत्याने एकंदर सर्व धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांस कोणत्या तऱ्हेने मान द्यावा? या विषयी तुमचा तुम्हीच सरळ चोख विचार करून पहा.''

(b) ''एकवेळ बोरीकरां भानुभटा भटोबासाचे दर्शन जालेः कवणिपरी जाले ते नेणिजेः भटोबासांपासौनी श्रवण जालेः भीक्षा केलीः भटोबासां थोर पढीयेतिः तयांचे आधील गुरू तयां नावं केसवाचार्येः मग प्रकरणानुरूप भटोबासी भानुभटाचे नाव 'कविस्वर' ठेविलेः तैसेचि प्रकरणानुरूप 'भटो' ऐसे म्हणतिः.''

(c) ''तुमच्या कुटुंबाचे जे भवितव्य ठरले आहे ते ओळखण्याचे तुम्ही गर्वाने नाकारीत आहात आणि जितके दिवस ते तुम्ही नाकाराल तितके दिवस तुम्हाला स्थैर्य उत्पन्न होणार नाही. ज्या समाजात तुम्ही शिरू इच्छिता तो समाज तुम्हास कधीच घेणार नाही; आणि तो समाज तुम्हांस स्वीकारावयास तयार आहे त्या समाजास तुम्ही स्वतःपेक्षा कमी समजून वगळीत आहात.''

(d) ''नेव्हर माइंड, झालं ते गेलं, तू या प्रकारचा निघालास तरी तुझं ठीकच चाललंय की ! आईबापांना क्षमा करायला शीक अधूनमधून. म्हातारपणी येणार नाही तुझ्याकडे कटकट करायला. हयाचे थोडे मार्क दे !''

(e) ''आमचे शत्रु बाहेर कुणीच नसतात ... आमच्या प्रिय व्यक्ती याच आम्हांला शत्रुवत वाटतात ... त्यांच्यावर चवताळणं, क्रूर वाग्बाणांनी त्यांना घायाळ करणं, हेच आमचे पराक्रम .... आणि गळणाऱ्या रक्ताकडं पाहून पश्चातापानं तडफडणं, जळत राहाणं, हीच आमची दिनचर्या !''

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) सामाजिक व वाङ्मयीन इतिहासाच्या दृष्टीने 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाचे महत्त्व विशद करा. 15

(b) शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे चित्र रेखाटून त्यांच्या स्थितीची मूलगामी मीमांसा म. फुले यांनी कशातऱ्हेने केली आहे, ते सांगा. 15

(c) 'कथानकाच्या आधारे आणि पात्रचित्रणाद्वारे डॉ० केतकर यांनी समाज प्रबोधनाचे कार्य यशस्वीपणे केले आहे' या मताची 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीच्या आधारे सत्यता पटवा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) प्र. के. अत्रे यांनी मराठी नाटकाला कोणकोणत्या बाबतीत नवे वळण लावले, ते 'साष्टांग नमस्कार' च्या आधारे लिहा. 15

(b) 'बाबुराव बागूलांची कथा समाजाची दुःखे नष्ट करण्याच्या तळमळीतून विद्रोही झाली आहे' या विधानाची साधार चर्चा करा. 15

(c) सार्वत्रिक स्वरूपाच्या मानवी भावभावनांचे प्रत्ययकारी चित्रण हे 'शिळान' या कथासंग्रहाचे वेगळेपण होय, कसे ते सांगा. 20

Optional Province · optionalprovince.com

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) प्र. ई. सोनकांबळे यांनी सोसलेल्या व्यथा-वेदनांचे चित्रण 'आठवर्णीचे पक्षी' मधून अत्यंत प्रभावीपणे प्रकट झाले आहे . कसे ते सांगा. 15

(b) 'जन हे वोळुतु जेथे' ही कादंबरी म्हणजे व्यक्ती आणि काळ यांच्या परस्पर संबंधांचा वास्तववादी वेध हे विधान तुम्हांस पटते काय? विवेचन करा. 15

(c) 'स्त्री-पुरूष नात्यांमधले सूक्ष्म आणि हळवे पदर हळूवारपणे उलगडून दाखवण्यात गौरी देशपांडे यांचे कौशल्य अपूर्व आहे' हे विधान 'एकेक पान गळावया' च्या आधारे स्पष्ट करा. 20

SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) ''मूलि उपवर हे जाहसी इयेला
पाहिजे की वर योग्य पाहिजेला
अशा ऐकोनि वधूचिया बोला
सैंवराचा मग यत्न नृपें केला.''

(b) ''पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा।
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बंदा।
सुईदोऱ्याला हयात असों द्या तोचि इनाम मोकासा।
निजकर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा।''

(c) ''ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेडयापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती.''

(d) ''पहाड ईथले मुके दिवस आंधळा की जसा
अभंग तिमिरांतला तडत चालला आरसा
तसा सहज नाचतों कधि न बांधिली पैंजणे
जशा धुळितल्या दिशा भुलुन गाय जी हंबरे...''

(e) ''कृपेची साउली अखंड लाधली । खेचर माउली भेटलीया
आतां मज भय नाही पै कोणाचे । जन्ममरणाचे दुःख गेले
बंधमोक्षाची फिटली काळजी । समाधि लागली समाधीसी
नामा म्हणें माझें सर्वही साधन । खेचरचरण न विसंबे.''

Optional Province · optionalprovince.com

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नामदेवांची भक्तिभावना त्यांच्या भावकवितेतून एका भाविक भक्ताच्या भूमिकेतून आविष्कृत होते—कशी ते सोदाहरण स्पष्ट करा. 15

(b) 'दमयंती-स्वयंवर' या आख्यानकाव्यात रम्य स्थलवर्णने व मुग्ध शृंगारवर्णने यांच्यामुळे सौंदर्य आले आहे, स्पष्ट करा. 15

(c) शाहिरी कवितेने सामान्य व्यक्तींच्या लौकिक जीवनाचा प्रभावी आविष्कार कसा केला आहे, ते सोदाहरण पटवून द्या. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'निसर्गाकडे व त्यातील सौंदर्याकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी हा बालकवींचा मराठी कवितेला प्रेमाचा आहेर आहे' या विधानाची यथार्थता पटवा. 15

(b) 'सायंकालीन गूढ भावार्त मनःस्थितीचे प्रकटीकरण कवी ग्रेस यांच्या कवितांतून उत्कटपणे जाणवत रहाते' सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेचे स्वरूप तुम्ही अभ्यासलेल्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) मढेकरांनंतर नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेला जिवंत आणि वास्तवाभिमुख बनविले 'जाहीरनामा' या काव्यसंग्रहाच्या आधारे विशद करा. 15

(b) जाणिवेच्या विविध स्तरांवरचे भावानुभव करंदीकर यांच्या 'मृदगंध' या काव्यसंग्रहातून समर्थपणे कसे व्यक्त झालेले दिसतात? ते लिहा. 15

(c) नामदेव ढसाळांची कविता एका विशिष्ट समाजाचेच नव्हे तर संपूर्ण शोषित आणि पीडित समाजाच्या वेदनांचे चित्रण करते 'हे विधान या सत्तेत जीव रमत नाही' च्या आधारे स्पष्ट करा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com